महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

अतितात्काळ/कालमर्यादा

क्र. पोमसं/१६/३६९९/कवृंप-५५ वी सभा/४८/२०१६

मुंबई, दि.०९/०९/२०२६.

संदर्भ :- शासन निर्णय, गृह विभाग, क्र.टीईएक्स ०५८२ (आर.एम.)/पोल-५, दि.२४/०८/१९८३.

विषय :- **राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद.**
पोलीसांची गा-हाणी सोडविण्याकरीता उभारण्यात आलेली यंत्रणा-पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभासदांची मुख्यालयाच्या स्तरावर निवड करण्याबाबत.

*********

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या क्र.पोमसं/डी-१६०२९/२/२०२३-डेस्क १६, दि.१७/०५/२०२४ च्या ज्ञापनान्वये, मुख्यालयाच्या स्तरावरील सभासदांची निवड करण्यात आली होती. सदर समितीची मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे पुढील ०२ वर्षाच्या कालावधीसाठी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद समितीच्या सभासदांची खालीलप्रमाणे नव्याने नियुक्ती करावयाची आहे:-

| अ.क्र. | सभासद निवडीचे पद | संख्या |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक | १ |
| २ | सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधीक्षक | २ |
| ३ | पोलीस निरीक्षक | ३ |
| ४ | पोलीस उपनिरीक्षक | ५ |
| ५ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई | ८ |
| ६ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई (रा.रा.पो.बल मधील अंमलदार) | २ |
| ७ | महिला पोलीस अंमलदार प्रतिनिधी (१ म.पो.हवा., व १ म.पो.शि.) | २ |
| | **एकूण सभासद** | **२३** |

२. सर्व घटक प्रमुखांनी नवीन सभासदांच्या नियुक्तीसाठी, ज्यांचा सेवा अभिलेख अत्युत्कृष्ट आहे, अशा पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या नावांची शिफारस खाली दर्शविल्याप्रमाणे करावी:-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक | :- | पोलीस महासंचालक यांचेकडून करण्यात येईल. |
| २ | सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीखक | :- | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी ३ सहायक पोलीस आयुक्तांच्या नावाची शिफारस करावी. तसेच, प्रत्येक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांनी प्रत्येकी एका उपअधीक्षकांच्या नावाची शिफारस करावी. |

कृ.मा.प.

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पोलीस निरीक्षक | :- | प्रत्येक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस आयुक्तांनी प्रत्येकी एका पोलीस निरीक्षकाच्या नावाची शिफारस करावी. |
| ४ | पोलीस उपनिरीक्षक | :- | परिक्षेत्राचे तसेच मोटार परिवहन, विभाग, बिनतारी संदेश व प्रशिक्षण, रा.रा.पो.बल यांचे अपर पोलीस महासंचालक/विशेष पोलीस निरीक्षकांनी प्रत्येकी ३ पोलीस उपनिरीक्षकांच्या नावांची शिफारस करावी. |
| ५ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई | :- | प्रत्येक घटक प्रमुखाने १ पोलीस हवालदार व १ पोलीस शिपायाच्या नावाची शिफारस करावी. |
| ६ | पो.हवा/पो.नाईक/पो.शिपाई (रा.रा.पो.बल मधील अंमलदार) | :- | विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे व नागपूर यांनी प्रत्येकी ३ पोलीस हवालदार व ३ पोलीस शिपायांच्या नावांची शिफारस करावी. |
| ७ | महिला पोलीस अंमलदार प्रतिनिधी (१ म.पो.हवा., व १ म.पो.शि.) | :- | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, नागपूर, पुणे व औरंगाबाद यांनी प्रत्येकी २ महिला पोलीस हवालदार, विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी प्रत्येकी २ महिला पोलीस शिपायांच्या नावांची शिफारस करावी. |

३. यासंबंधी विभाग प्रमुख/परिक्षेत्रे व घटक प्रमुखांचे लक्ष या कार्यालयाच्या गोपनीय परिपत्रक क्र.२१/३६९९, दि.०३/११/१९८३ कडे वेधण्यात येत असुन सदर परिपत्रकामधील सूचना/निर्देशांनुसार राज्यस्तरीय कर्मचारी वृंद परिषदेकरीता नवीन सभासदांच्या नियुक्तीसाठी पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या नावांची शिफारस खालील विवरणपत्रामध्ये सविस्तर माहितीसह कृपया कार्यालयाचे ई-मेल क्र. desk16.dgoffice@mahapolice.gov.in तथा ई-ऑफिसवर दिनांक २३/०९/२०२६ पूर्वी न चुकता कार्यालयास पाठवावी:-

| अ. क्र. | नांव व पदनाम | नेमणूक | बक्षिसे | शिक्षा | | मागील ५वर्षाचे शेरे | | | | | विभाग प्रमुख / परिक्षेत्र प्रमुख व घटक प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लहान | मोठी | २०२१ | २०२२ | २०२३ | २०२४ | २०२५ | |
| | | | | | | | | | | | |

( अभिषेक त्रिमुखे )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म. राज्य, मुंबई. (सस्नेह)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे.



Scanned with OKEN Scanner

अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक / वाहतूक / महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ / आर्थिक गुन्हे / रा.रा.पो.बल / प्रशिक्षण व खास पथके, म. राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, दळणवळण व परिवहन विभाग, म.राज्य, पुणे.

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, सायबर / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग व नागरी हक्क संरक्षण, म. राज्य, मुंबई.

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह व बृहन्मुंबई वगळून)

अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, रा.गु.वि. / फोर्स वन / प्रशिक्षण व खास पथके / सागरी सुरक्षा विभाग, रा.गु.वि., म. राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर / अमरावती / नांदेड.

पोलीस उपआयुक्त, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण, कलिना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग/ मोटार परिवहन विभाग / दळणवळण व परिवहनसह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुरावर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक / अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १९.

पोलीस अधीक्षक, शस्त्र निरीक्षण शाखा, पुणे.

**प्रत माहितीसाठी :-**

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, म. राज्य, मुंबई.

२/- सदरहू ज्ञापन mahapolice.gov.in या वेबसाईटवर दि.२५/०९/२०२६ पर्यंत ठेवण्यात यावे.

(मराठी **शिर्षक- ५९ वी राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषद**/ English Titel- **५९**TH State Staff Council)

**प्रत,**

अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहायक.

Scanned with OKEN Scanner

Confidential
Immediate

No.XXI/3699                    Bombay, 3rd November 1983.

Ref:-G.R.H.D.No.TEX.0582(R.M.)POL-5-A,
dated 24th August 1983.

Sub:-Machinery for redressal of grievances of Police Personnel-Formation of Police Staff Council.

....

CIRCULAR MEMO:

Government in their Resolution referred to above accorded sanction to the establishment of Staff Council at the State and Unit level. Accordingly a Unit Staff Council will be formed for:-

i) Each Commissionerate.
ii) Each District (including three Rly.Districts).
iii) Each S.R.P.F.,Group.
iv) Motor Transport Section at Pune.
v) Wireless Organisation at Pune.
vi) C.I.D.(Int.Spl.Wing) at Bombay.
vii) C.I.D.(Crime) and Int.(Criminal Wing) at Pune.
viii) Anti Corruption and P.I.Bureau at Bombay.
ix) Each Regional Police Training School.
x) The Police Training College and Detective Training School,Nasik.

2. The composition of the Staff Council for each unit would be as under:-

| | | |
|---|---|---|
| 1. | Director/Commissioner/Superintendent/ Commandant and Principal (Ex-Officio Chairman) .. | 1 |
| 2. | Dy.Commr.of Police(Hd.Quarters)/ Asstt.Commr.of Police/Asstt. Commandant/Dy.Supdt.of Police (Headquarters). .. | 1 |
| 3. | Police Inspector .. | 1 |
| 4. | Police Sub-Inspector and Asstt.Sub-Inspector .. | 2 |
| 5. | Head Constables/Police Naiks/ Constables (2 each from Armed and Unarmed Branches) .. | 4 |
| 6. | Representative of Women Police .. | 1 |
| 7. | Police Prosecutors .. | 1 |
| | | 11 |

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

3. As mentioned in the G.R. referred to above, the Staff Council at the State Police Headquarters will consist of the following:-

| | | |
|---|---|---|
| 1. Director General of Police (Ex-Officio Chairman) | .. | 1 |
| 2. Special Inspector General of Police (Ex-Officio Vice Chairman) | .. | 1 |
| 3. Deputy Inspector General of Police, Planning and Co-ordination (Member Secretary) | .. | 1 |
| 4. Commissioner of Police, Bombay | .. | 1 |
| 5. Superintendent of Police | .. | 1 |
| 6. Assistant Commissioner of Police/ Deputy Superintendent of Police. | .. | 2 |
| 7. Police Inspectors | .. | 3 |
| 8. Police Sub-Inspectors | .. | 5 |
| 9. Police Head Constables/ Police Naiks/Police Constables | .. | 8 |
| 10. Police Head Constable/ Police Naiks/Police Constables (State Reserve Police Force Group) | .. | 2 |
| 11. Police Prosecutors | .. | 1 |
| 12. Representative of Women Police | .. | 1 |
| | | 27 |

4. The members of the Staff Council would be nominated by the Director/Commissioner/Supdt.of Police/Commandant, whoever heads the Unit. It would be absolutely necessary for the Commissioner/Director/Supdts.of Police to ensure that the men nominated fulfill the qualifications laid down in para 5 of the Government Resolution. Since the S.R.P.F. groups have a large complement of wireless staff, the Commandants may nominate one representative of wireless staff instead of one Head Constable. The Ss.P. of districts/ Rlys./M.T., Commandants of S.R.P. and Principals of R.P.T.Ss. are requested to submit information in the Proforma given below of the names of members nominated to their respective D.I.Gs.

| Sr. No. | Name | Rank | Date since when officiating | Rewards and punishments during the preceding 3 years. | Date of retirement. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(13) (e)

The D.I.Gs. would be expected to scrutinise the list and ensure that every member nominated fulfills the qualifications laid down in the G.R. and is not disqualified by the conditions enumerated in the G.R. In other Units the head of the Unit concerned would themselves scrutinise these lists.

5. All meetings would be held at regular intervals as mentioned in para 8 of the Govt.Resolution and proper minutes of the meetings maintained in the office of the Unit Commanders. The Supdts.of Police would submit a copy of the minutes to the concerned D.I.G. Any item which can be dealt with by the Unit Commanders at their level would be attended to by them promptly and remarks to that effect made in the minutes. Items that cannot be attended to by the Unit Commanders would if necessary be taken up by the State Level Body. The D.I.Gs. should scrutinise all minutes of the quarterly meetings received from the Units in their charges and send a consolidated statement of only those items which they think to be important enough to be taken up at the State Level. Similar action will be taken by Spl.I.G.(Crime)/Commissioners/Directors and Principal P.T.C. in respect of matters discussed in the meetings of their Staff Councils. The consolidated report from each D.I.G. and those from the Directors/Commissioners should be addressed by name to the member secretary of the State Sta-ff Council and should be sent within a fortnight of the quarterly meetings.

( Sudhakar Dev )
D.I.G.P.(P.and C.)
For Director General of Police.

To

The Director,Vig.A.C.and P.I.B.and Spl.I.G.P.,M.S., Bombay.
The Spl.I.G.P.,C.I.D.(Crime),M.S.,Pune.
The Commissioner,CID.(Int.Spl.Wing),M.S.,Bombay.
All Commissioners of Police.
All D.Is.G.P.
The Principal P.T.C.,Nasik.
The Director of Police Wireless,M.S.,Pune.
All Supdts.of Police (including Rlys.,M.T.,$
All Commdts.,S.R.P.F.,Groups.
All Principals R.P.T.Schools.
The Principal D.T.S.,Nasik.

DR:3/11

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

पोलीसांची गा-हाणी सोडवून घेण्याकरिता
उभारण्यात आलेली यंत्रणा.

महाराष्ट्र शासन,
गृहविभाग,

निर्णय क्रमांक : टीइएक्स ०५८२[आर.एम]/पोल ५ अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक : २४ ऑगस्ट १९८३

__शासन निर्णय:-__ भारत सरकारने नियुक्त केलेल्या राष्ट्रीय पोलीस आयोगाने पोलीस दलातील लोकांना त्यांची गा-हाणी परिणामकारक रितीने मांडून ती व्यवस्थित रितीने समजून घेऊन सोडविता येणे शक्य व्हावे याकरिता त्यांना संघटना उभारण्याची परवानगी देण्यात यावी अशी शिफारस केली होती. त्यानुसार आयोगाने प्रत्येक जिल्हा स्तरावर तसेच राज्य पोलीस मुख्यालयाच्या स्तरावर कर्मचारी वृन्द परिषदा स्थापन कराव्यात अशी शिफारस केली होती. पोलीस दलातील सेवाशर्तीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून ज्या सूचना व प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले होते त्यांचा विचार करण्याकरिता राज्य सरकारने "सोमण समिती" नेमली होती. त्या समितीने सुध्दा पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता गा-हाणी सोडविणारी यंत्रणा असावी अशी शिफारस केली आहे. राष्ट्रीय पोलीस आयोग व सोमण समिती यांच्या या शिफारशी शासनाच्या विचाराधीन होत्या. या प्रश्नाचा सखोल अभ्यास केल्यानंतर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

२. शासनाने असा निर्णय घेतला आहे की, प्रत्येक घटकाकरिता घटक [ ] पातळीवर [जिल्हा पोलीस, राज्य राखीव पोलीस दल, विभागीय पोलीस प्रशिक्षण शाळा ही स्वतंत्र घटके समजण्यात यावीत.] कर्मचारी वृन्द परिषद असावी. या परिषदेस जिल्हा पोलीस कर्मचारी वृन्द परिषद असे संबोधण्यात यावे व त्याचे पदाधिकारी खालीलप्रमाणे असावेत

| | |
|---|---|
| १] पोलीस अधीक्षक [पदसिध्द अध्यक्ष] | १ |
| २] सहाय्यक पोलीस आयुक्त/सहाय्यक समादेशक/ पोलीस उप अधीक्षक [सदस्य सचिव] | १ |
| ३] पोलीस निरीक्षक | १ |
| ४] पोलीस उपनिरीक्षक आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक | २ |

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ५) पोलीस हवालदार/जमादार आणि पोलीस नाईक/पोलीस शिपाई [सशस्त्र व निःशस्त्र शाखेतून प्रत्येकी एक- पोलीस हवालदार-जमादार आणि एक- पोलीस नाईक-पोलीस शिपाई ] | ४ |
| ६) महिला पोलीस किंवा महिला पोलीस अधिकारी-यांपैकी एक प्रतिनिधी [ ज्या विशिष्ट घटकात महिला पोलीस शाखा असेल तेथेच महिला पोलीस किंवा महिला पोलीस अधिकारी यांना प्रतिनिधीत्व असेल.] | १ |
| ७) पोलीस अभियोक्ता | १ |
| | ११ |

३. शासनाने असाही निर्णय घेतला आहे की खालील विशेष शाखांकरिता वेगळी कर्मचारी वृन्द परिषद असावी:-

१) गुन्हा अन्वेषण विभाग- [गुप्तवार्ता]

२) गुन्हा अन्वेषण विभाग- [ गुन्हे शाखा]

३) लाचलुचपत प्रतिबंध आणि दारुबंदी गुप्तवार्ता केंद्र

४) पोलीस बिनतारी यंत्रणा

५) पोलीस मोटार परिवहन यंत्रणा.

तथापि याबाबत असे स्पष्टीकरण करण्यात येते की, जे कर्मचारी पोलीस अधीक्षक, मोटार परिवहन आणि संचालक, पोलीस बिनतारी यंत्रणा यांच्या प्रत्यक्ष प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करित असतील अशाच कर्मचा-यांना या दोन कर्मचारी वृन्द परिषदेवर प्रतिनिधीत्व मिळेल म्हणून जिल्हा, आयुक्तालय आणि राज्य राखीव पोलीस दल येथे काम करणारे बिनतारी यंत्रणेतील कर्मचारी , जे संबंधित घटक प्रमुखांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहेत त्यांना या कर्मचारी वृन्द परिषदांमध्ये प्रतिनिधीत्व असणार नाही.

४. याबाबत असाही निर्णय घेण्यात आला आहे की, पोलीस मुख्यालयाच्या स्तरावर खालील सभासदांनी युक्त अशी "राज्य पोलीस कर्मचारी वृन्द परिषद" असावी :-

| | |
|---|---|
| १] पोलीस महासंचालक [पदसिध्द अध्यक्ष] | १ |
| २] विशेष पोलीस महानिरीक्षक [पदसिध्द उपाध्यक्ष] | १ |
| ३] पोलीस उपमहानिरीक्षक, नियोजन आणि सहकार्य, सदस्य सचिव. | १ |
| ४] पोलीस आयुक्त, मुंबई | १ |
| ५] पोलीस अधीक्षक | १ |
| ६] सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक | २ |
| ७] पोलीस निरीक्षक | ३ |
| ८] पोलीस उपनिरीक्षक | ५ |
| ९] पोलीस हवालदार/जमादार आणि पोलीस नाईक/पोलीस शिपाई | ८ |
| १०] पोलीस हवालदार/जमादार आणि पोलीस नाईक/पोलीस शिपाई [राज्य राखीव पोलीस दल गट] | २ |
| ११] पोलीस अभियोक्ता | १ |
| १२] महिला पोलीसांचा प्रतिनिधी | १ |
| | २७ |

५. जिल्हा तसेच राज्य पोलीस कर्मचारी वृन्द परिषदेचे सदस्यत्व प्राप्त होण्याकरीता आवश्यक असणारी पात्रता, व सदस्यत्व पुढे चालू न ठेवण्याची अपात्रता खाली नमूद केल्याप्रमाणे :-

कर्मचारीवृन्द परिषदेचे सदस्यत्व प्राप्त होण्याकरीता आवश्यक असणारी अर्हता :-

१] दिवी गट पदाकरीता पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक यांच्या ज्येष्ठता यादीतील प्र. या प्रत्येक दर्जातील संख्या ५० पेक्षा जास्त नसेल तर पहिल्या दहावीत उमेदवार त्या पदाच कर्मचारीवृन्द परिषदेचा सदस्य म्हणून नामनिर्देशित केला जाईल. ज्या ठिकाणची संख्या ५० पेक्षा जास्त परंतु ५०० पेक्षा जास्त नसेल तेथे तो ज्येष्ठता यादीतील पहिल्या २५ मेंबरापैकी असेल जेथे ५०० पेक्षा अधिक संख्या असेल तेथे तो त्यादर्जाच्या



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

ज्येष्ठता यादीतील पहिल्या ५० पैकी असेल.

२. सदस्य ज्या दर्जाचे प्रतिनिधित्व करीत असेल त्या दर्जामध्ये त्याची ५ वर्षे सेवा झालेली असली पाहिजे.

३. सदस्य म्हणून नामनिर्देशन झाल्यापासून त्याची सेवानिवृत्तीपूर्व किमान २ वर्षे तरी सेवा झालेली असली पाहिजे.

४. नामनिर्देशन होण्यापूर्वी ३ वर्षे अगोदर त्याला कोणतीही मोठ्या स्वरूपाची शिक्षा झालेली असताकामा नये. तसेच निवड होण्याच्या वेळी तो कोणतीही मोठ्या स्वरूपाची शिक्षा भोगत असता कामा नये. किंवा त्याच्या विरुध्द कोर्टात फिर्याद दाखल झालेली असता कामा नये. किंवा दोषारोप ठेवून त्याच्या विरुध्द विभागीय चौकशी आयोजण्यात आलेली असता कामा नये.

५. नामनिर्देशन होण्यापूर्वीच्या ५ वर्षांच्या काळामध्ये त्याचा सेवा अहवाल चांगला असला पाहिजे.

६. सदस्यत्वाचा कालावधी २ वर्षांचा असून आणि कोणत्याही उमेदवाराला त्या किंवा इतर घटकामध्ये नामनिर्देशनाच्या वेळेला असलेला दर्जा धारण करत असताना दोन पेक्षा जास्त पदावधीसाठी नामनिर्देशित केले जाणार नाही.

अपवाद -

१] कर्मचारी वृन्द परिषदेचा सदस्य म्हणून नामनिर्देशन झाल्यानंतर, जर त्या सदस्याविरुध्द कोर्टात खटला दाखल करण्यात आला किंवा दोषारोप ठेवून ~~त्याच्या~~ त्याच्या विरुध्द विभागीय चौकशी आयोजित करण्यात आली तर त्याला कर्म त्या कर्मचारी वृन्द परिषदेचा सदस्य म्हणून रहाता येणार नाही.

२] जर एखादा सदस्य पोलीस दलातील कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना पेटवित असल्याचे किंवा पोलीस दलातील शिस्तीला बाधा येईल असे वर्तन करीत असल्याचे घटक कर्मचारी वृन्द परिषदेच्या अध्यक्षाच्या निदर्शनास आले तर, ते आपल्या निकट वरिष्ठाच्या अनुमतीने त्याला सदस्य पदावरुन दूर करतील. राज्य पोलीस कर्मचारी वृन्द परिषदेच्या सदस्यांच्या बाबतीत हे अधिकार पोलीस महासंचालकाकडे असतील.

३] पोलीस महासंचालकाना राज्य पोलीस कर्मचारी वृन्द परिषदेवर दोन जादा सदस्यांची किंवा सल्लागारांची नियुक्ती करण्याचे अधिकार असतील.

पुणे-५९६

तसेच प्रधान कर्मचारी वृन्द परिषदेच्या अध्यक्षांना ज्यांना परिषदेमध्ये प्रतिनिधीत्व मिळालेले नाही अशांना उदाहरणार्थ, स्वयंपाकी, भोजनालयातील कर्मचारी, चर्मकार, शिंपी, न्हावी इत्यादींना प्रतिनिधीत्व देण्याचे स्वातंत्र्य असेल.

७) पोलीस महासंचालकांना राज्यस्तरावरील किंवा प्रधानमातहतीवरील कर्मचारी वृन्द परिषदेमधील सदस्यांच्या नामनिर्देशनामध्ये संयुक्तीक कारणास्तव बदल करण्याचे अधिकार असतील. मात्र या बदलाबाबतच्या कारणांची लिखित नोंद त्याने ठेवली पाहीजे.

८) प्रधान कर्मचारी वृन्द परिषदेची तीन महिन्यातून एकदा व राज्य कर्मचारी वृन्द परिषदेची सहा महिन्यातून एकदा सभा घेण्यात यावी. दोन्ही परिषदांचे सदस्य त्यांच्या सेवाशर्ती, पोलीस दलाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, विविध कायद्यांची अंमलबजावणी आणि पोलीस महासंचालक, वेळोवेळी जाहीर करतील अशा सर्वसामान्य हिताच्या बाबींसंबंधी चर्चा करतील तथापि कोणत्याही विशिष्ठ व्यक्तींच्या बदल्या विभागीय चौकश्या यांच्याशी संबंधित असलेल्या गाऱ्हाण्यांविषयीची चर्चा कर्मचारी वृन्द परिषदेमध्ये होता कामा नये.

९) पोलीस महासंचालक/ विभागीय पोलीस उप महानिरीक्षक/ पोलीस आयुक्त /पोलीस अधीक्षक आणि वर नमूद केलेल्या विशेष शाखांचे प्रमुख यांनी हे आदेश पोलीस विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावेत आणि कर्मचारी वृन्द परिषदेची उभारणी शक्य तितक्या लवकर होईल या दृष्टीने उपाय योजना करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ बी. के. चौगुले. ],
शासनाचे विशेष सचिव,
गृहविभाग,

प्रति,

महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, लाचलुचपत प्रतिबंधक [illegible]
व विशेष पोलीस महानिरीक्षक, मुंबई.

५५ ५९६
-१०००-

Scanned with OKEN Scanner

== ६==

अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक, गुन्हा अन्वेषण विभाग,
[गुन्हा] महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस आयुक्त[ गुप्तवार्ता,] गुन्हा अन्वेषण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व उप पोलीस महानिरीक्षक,
संचालक, पोलीस बिनतारी यंत्रणा, पुणे,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस दल गट.
सर्व पोलीस अधीक्षक,
[रेल्वे व मोटार परिवहन शाखा यांच्या सहित. ]

-------------

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner